Times of India
11 FEB 2017

# SUK summer semester from March 24

Piyush.Bhusari@timesgroup.com

**Kolhapur:** The summer semester of Shivaji University, Kolhapur (SUK) will start from March 24 , said Mahesh Kakade, controller of examinations (COE), SUK in a circular on February 6.

In the circular, Kakade said, "Students should submit their examination forms by February 28 and pay their fees latest by March 6. Students can submit their fees latest by March 11."

The circular had details about the date of examination in different courses. The circular details are also available on the university website.

Unlike previous years, this year summer semester will begin on time. Last year, the exam dates were preponed due to drought like condition in the state. This condition had forced the university to conduct their engineering exams almost 40 days earlier . However, this year, with no such condition the exam will begin as per schedule.

An SUK official said, March 2017 semester examination for the various under-graduate and post-graduate courses will begin in less than 50 days from now."

The circular said, "Since there is a state eligibility test (SET) scheduled on April 16, there wont be any university exams on April 15 and 16. As far as seating arrangements are concerned students from two different courses will be made to sit on a single bench.

Kakade said, "The ultimate goal of the departments is to bring down the overall examination schedule to 30 days. We donot want to extent examination dates."

## IMPORTANT INFO

- No. of examinations: 600
- No. of affiliated colleges: 282
- Total no. of students: Around 3 lakh

### Important dates

- Submission of examination form and fee: by February 28
- Submission with late fee: March 6 to 11

11 FEB 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# Shivotsav 2017 kicks off with rally on cashless transactions

Pics: Rahul Gaikwad





The inter-university youth festival, Shivotsav 2017 was inaugurated at Shivaji University, Kolhapur on Friday. More than 1,500 students' across the country are participating in the annual festival





**Piyush.Bhusari**
@timesgroup.com

**Kolhapur:** The 32nd national-level inter university festival—Shivotsav 2017—started at the Shivaji University, Kolhapur (SUK) campus on Friday with thousands of students attending the event.

From demonstrations on ancient fighting traditions to a rally on the theme 'Cashless transactions-Empower to Indian Economy' the campus witnessed a range of events on Friday.

D R More, SUK's acting vice-chancellor, flagged off the rally where was students joined in with their different presentations. The previous year's youth festival winner — Banaras Hindu University — headed the rally, while the SUK was the last of the teams as it was the host.

The festival was inaugurated in presence of Chhatrapati Shahu Maharaj and well-known Marathi film actor Sachin Khedekar, along with Sampson David, the Association of Indian Universities (AIU) joint secretary and other SUK officials.

**The previous year's youth festival winner – Banaras Hindu University – headed the rally, while the SUK was the last of the teams as it was the host**

Sachin Khedekar said that the youth festival is a great platform for students to showcase their talent and they should make the most of this opportunity.

"There are so many mediums available for youngsters these days, however, the information they get from these platforms should not be mistaken as correct and authentic information. This borrowing of knowledge can be harmful for students," he said.

He said that his career had also started from a youth festival. "My career started from a youth festival only and even though this is a thing of the past, it still cheers me up," he said.

On the occasion, Chhatrapati Shahu Maharaj said that the number of people trying to safeguard a culture is growing. "One should respect other cultures too and the youth festival teaches us about such values," he said.

Sampson David, in his speech, focused on the need for the youngsters to channel their energy and enthusiasm for the betterment of the human and national values.

On the festival arrangements, R V Gurav the director of students' welfare at SUK, said that around 1,300 students and their team managers from selected universities are participating in this coveted festival.

"The event is sponsored by the Association of Indian Universities and the ministry of youth affairs and sports," Gurav said.

11 FEB 2017

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात अवतरला एकसंध भारत

## राष्ट्रीय युवा महोत्सवाला धडाक्यात प्रारंभ, पारंपरिक वेषभूषा करून विद्यार्थ्यांचा सहभाग

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

निसर्गाच्या जवळ नेणारे आसमचे बिहू नृत्य, ढोलाच्या ठेक्यावर फेर धरायला लावणारा भांगडा, दाक्षिणात्य संस्कृतीचे दर्शन घडवणारा नृत्यप्रकार कदकळ तय्यम अशा बहुविध कलाप्रकारांची शोभायात्रा शुक्रवारी शिवाजी विद्यापीठ परिसरातून निघाली. शुक्रवारी सायंकाळी निघालेल्या या शोभायात्रेच्या निमित्ताने विविधतेने नटलेल्या पण एकसंध असलेल्या भारताचे दर्शनच उपस्थितांना झाले. पारंपरिक वेशभुषा आणि बोलके फलक यातून विद्यार्थ्यांनी कॅशलेस आर्थिक व्यवहारांची संकल्पना मांडली.

शिवाजी विद्यापीठामध्ये ३२ व्या राष्ट्रीय युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. हा महोत्सव १० ते १४ फेब्रुवारी या कालावधीमध्ये विद्यापीठाच्या प्रांगणात संपन्न होणार आहे. शुक्रवारी शोभायात्रेने महोत्सवाला प्रारंभ झाला. प्रभारी कुलगुरू डॉ. डी. आर. मोरे यांनी चित्ररथाला विद्यापीठाचा ध्वज दाखवून शोभायात्रेला प्रारंभ झाला. विद्यापीठाच्या मुख्य इमारती समोरून शोभायात्रेची सुरुवात झाली.




**कोल्हापूर: शिवाजी विद्यापीठातील ३२ व्या युवा महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी शोभायात्रेत सहभागी विद्यार्थी.**

सायबर चौक, आईचा पुतळा, प्रतिभानगर, मालती अपार्टमेंट, एनसीसी भवन कार्यालय या मार्गे ही शोभायात्रा निघाली. देशभरातील ७० विद्यापीठातील विद्यार्थी यामध्ये सहभागी झाले होते. शोभायात्रेच्या अग्रस्थानी विद्यापीठाचा ध्वज होता. त्यामागे विद्यापीठाचा चित्ररथ होता. या चित्ररथाच्या माध्यमातून विद्यापीठातील पक्षी, वृक्ष वैभव दाखवण्यात आले. सुहासराजे ठोंबरे मर्दानी खेळ आखाडा, खंडोबा तालीम मंडळाच्या मावळ्यांनी शिवकालीन युद्धकलेची थरारक प्रात्यक्षिके सादर केली.

शोभायात्रेमध्ये झारखंड येथून आलेल्या विनोबा भावे विद्यापीठाच्या विद्यार्थीनी नारीशक्तीचा नारा दिला. तर आसामच्या तेजपूर विद्यापीठाने पेटीएम द्वारे कॅशलेस संकल्पना मांडली. आसामचा चहा, काझीरंगाचे अभयारण्य या देखाव्यांच्या माध्यमातून त्यांनी आसामी संस्कृतीचे दर्शन घडवले. बिहारच्या ललीत नारायण मिथीला विद्यापीठाच्या विद्यार्थीनी डिजीटल फलकातून कॅशलेसचे फायदे विषद केले. जम्मु विद्यापीठाने कॅशलेस रॅलीच्या देखाव्यातून नोटाबंदी निर्णयाचे स्वागत केले. शोभायात्रेत सहभागी झालेल्या प्रत्येक विद्यापीठाने नोटाबंदी, कॅशलेस इंडीया, डिजीटल इंडीयाचे दर्शन आपल्या चित्ररथातून दाखवले. आंध्रप्रदेशच्या कृष्णा विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी मचलीपटनम या पारंपरिक वाद्यांच्या माध्यमातून कॅशलेस संकल्पना मांडली. मैसूर विद्यापीठ कर्नाटकाने ढोलु पुढीता हा वाद्य प्रकार सादर केला. यजमान शिवाजी विद्यापीठाने आकर्षक रथ बनवला होता. या रथाच्या माध्यमातून कोल्हापुरचा जाज्वल्य इतिहास, सांस्कृतिक परंपरा या गोष्टी दाखवल्या. सीपीआर व जिल्हा एडस नियंत्रण पथकाकडून एडस् नियंत्रण जनजागृती करण्यात आली. ही. या शोभायात्रेत उत्तम सादरीकरण करणाऱ्या संघांमधून तीन विजेत्या संघांची निवड करण्यात येणार आहे.



**युवा महोत्सवाच्या शोभायात्रेत श्री. शंकराचार्य कानडी विद्यापीठातील विद्यार्थ्यांने कानडी नृत्य कदकळ तय्यम सादर केले.**

यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, एआययूचे सहसचिव डॉ. सॅम्पसन डेव्हीड, एआययूचे निरीक्षक प्रा. एस.के. शर्मा, अजित चौगुले, महेश काकडे, डॉ. आर.व्ही. गुरव, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. डी.के. गायकवाड यांच्यासह प्राचार्य, शिक्षक, प्रशासकीय सेवक, विद्यार्थी–विद्यार्थिनी उपस्थित होते.

### विविध संस्कृतीचे दर्शन झाले



आसाममध्ये एकाच संस्कृतीचे दर्शन होत होते. येथे आल्यामुळे देशभरातील विविध वेशभूषा, नृत्य, शिवाजी विद्यापीठाचे सौंदर्य पाहावयास मिळाले. युवा महोत्सवाचे वातावरण पाहून आमचा उत्साह वाढला आहे. इतर ठिकाणची संस्कृती जाणून घेण्याचा प्रयत्न करीत आहे.

**रुपाली कायब**
**(तेजपूर विद्यापीठ, आसाम)**







# राष्ट्रीय युवा महोत्सव...

शिवाजी विद्यापीठात ३५ व्या युवा महोत्सवाची रंगारंग शोभायात्रेने उत्साहात सुरवात झाली या शोभायात्रेची सचित्र झलक...
१) कृष्णा युनिव्हर्सिटी आंध्र प्रदेशचे विद्यार्थी कलाकार. २) कुरुक्षेत्र विश्वविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी हरियाणा येथील संस्कृतीचे दर्शन घडवले.
३) कृष्णा युनिव्हर्सिटी आंध्र प्रदेशमधील पारंपरिक वेषातील विद्यार्थिनी ४) तिरुपतीच्या पद्मावती विद्यापीठातील कलाकारांनी लोककला सादर केली.
५), ६), ७) जालंधर तसेच आसाम येथील विद्यापीठांनी आपल्या लोक संस्कृतीचा जागर करत शोभायात्रेची शान वाढवली.
(छायाचित्रे : शशिकांत मोरे)















11 FEB 2017

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# तंत्रज्ञानाच्या युगातही गुरूच श्रेष्ठ

## अभिनेते सचिन खेडकर यांचे प्रतिपादन : शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय युवा महोत्सवाचे थाटात उद्घाटन

प्रतिनिधी
कोल्हापूर

मनुष्याला रागावण्यासाठी खूप कष्ट घ्यावे लागतात, हसत राहण्यासाठी मात्र अजिबात कष्ट पडत नाहीत. त्यामुळे युवकांनी यश आणि अपयश अशा दोन्ही परिस्थितीत हसत राहायला शिकले पाहिजे. प्रत्येकाने आयुष्यातील गुरूचा आदर्श घेऊन त्यांचे स्थान अधोरेखित केले तर आयुष्याला योग्य दिशा मिळेल, असे प्रतिपादन चित्रपट अभिनेते सचिन खेडकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात ३२व्या अखिल भारतीय आंतर-विद्यापीठ युवा महोत्सवाचे उद्घाटन जल्लोषपूर्ण वातावरणात झाले. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. याप्रसंगी भारतीय विद्यापीठ महासंघाचे सहसचिव डॉ. डेव्हीड सॅम्पसन, चित्रपट अभिनेते सचिन खेडकर यांनी प्रमुख उपस्थिती दर्शवली. प्रभारी कुलगुरू डॉ. डी. आर. मोरे अध्यक्षस्थानी होते. या महोत्सवात देशभरातील ७७ विद्यापीठांचे संघ सहभागी झाले आहेत. याप्रसंगी वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र अधिविभागाच्या विद्यार्थ्यांनी संपादित केलेल्या 'माध्यमविद्या' या युवा महोत्सव विशेषांकाचे मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात ३२व्या राष्ट्रीय युवा महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी मार्गदर्शन करताना चित्रपट अभिनेते सचिन खेडकर. सोबत डावीकडून डॉ. पी. टी गायकवाड, डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. डेव्हिड सॅम्पसन,डॉ. डी. आर. मोरे, श्रीमंत शाहू महाराज , महेश काकडे आदी.

अभिनेते खेडकर म्हणाले सोशल मिडीयाच्या माध्यमातून युवकांना सहज अनेक मार्ग उपलब्ध आहेत. त्यावरुन अनेकविध गोष्टींची माहिती त्याला मिळत असते. याठिकाणी कोणतीही कला, विषय शिकता येऊ शकतो, तिचा सरावही करता येऊ शकतो. मात्र त्या माहितीलाच ज्ञान समजण्याची चूक आपल्या हातून होत असते. ही उसनवारी अत्यंत चुकीची व घातक ठरू शकते. म्हणूनच माहितीचे ज्ञानात रुपांतर करून विद्यार्थ्याला प्रज्ञावान बनविणाऱ्या गुरूचे आपल्या आयुष्यातील स्थान आजच्या या समाजमाध्यमांच्या युगातही अबाधित आहे.

श्रीमंत शाहू महाराज म्हणाले, राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या कलानगरीला कलेचा मोठा वारसा आहे. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी कलेला राजाश्रय दिला. संस्कृतीरक्षक मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. आपली संस्कृती इतरांवर लादण्यापेक्षा एकमेकांच्या संस्कृतीचा सन्मान करण्याची शिकवण अशा महोत्सवांतून मिळत असते.

डॉ. डेव्हीड सॅम्पसन म्हणाले, तारुण्य हे सूर्यप्रकाशासारखे लख्ख असते. तारुण्यातच सृजनशीलतेची क्षमता व प्रमाण सर्वाधिक असते. या ऊर्जेचा सकारात्मक वापर केला पाहिजे. प्रभारी कुलगुरू डॉ. डी.आर. मोरे म्हणाले, विद्यार्थ्यांनी त्यांच्या अंगभूत कौशल्यांचा विकास करून घेण्यासाठी आणि भावी आयुष्यातील वाटचालीच्या दृष्टीनेही अशा महोत्सवांसारख्या व्यासपीठांचा वापर केला पाहिजे. युवक ही राष्ट्राची शक्ती असून राष्ट्र सक्षम होण्यासाठी सक्षम युवा शक्तीची नितांत गरज असते, ही बाब लक्षात घेऊन युवकांनी आपले योगदान देण्यासाठी सज्ज व्हावे, असे आवाहनही त्यांनी केले.

कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी स्वागत केले. विद्यार्थी कल्याण संचालक डॉ. आर.व्ही. गुरव यांनी प्रास्ताविक केले. परीक्षा नियंत्रक महेश काकडे यांनी आभार मानले. व्यासपीठावर ए.आय.यू.चे निरीक्षक प्रा. एस.के. शर्मा, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. डी.के. गायकवाड, क्रीडा अधिविभाग प्रमुख डॉ. पी.टी. गायकवाड यांच्यासह संयोजन समिती सदस्य उपस्थित होते.

अमित गद्रे



**ऊर्जा...** शिवाजी विद्यापीठात शुक्रवारपासून आंतरविद्यापीठ राष्ट्रीय युवा महोत्सवाला (शिवोत्सव) सुरुवात झाली. प्रांतोप्रांतीच्या संस्कृतीचे दर्शन घडवत सहभागी झालेल्या युवकांनी विद्यापीठाचे प्रांगण शुक्रवारी प्रचंड ऊर्जा आणि उत्साहाने भारून टाकले. पारंपरिक वेशभूषेत सहभागी झालेल्या पंजाब विद्यापीठाच्या विद्यार्थिनी. वृत्त...२

# ‘शिवोत्सवा’त भारत दर्शन

## शिवाजी विद्यापीठात महोत्सव सुरू; पारंपरिक नृत्य, पोशाखांमुळे मिरवणुकीत रंगत

**विद्यार्थ्यांच्या कलागुण आणि अभिनय कौशल्यांना वाव देणाऱ्या ३२ व्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ राष्ट्रीय युवा महोत्सवाला (शिवोत्सव) शुक्रवारी शिवाजी विद्यापीठात थाटात प्रारंभ झाला. मिरवणुकीच्या माध्यमातून विविध राज्यांतील विद्यापीठांनी भारतीय संस्कृतीचे दर्शन घडविल्यानंतर सायंकाळी विद्यापीठाच्या लोककला केंद्रात मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन झाले. अभिनेते सचिन खेडेकर आणि श्रीमंत छत्रपती शाहू महाराज यांच्या फटकेबाजीनंतर महाराष्ट्रीय संस्कृती दर्शनाचा कार्यक्रम झाला. चार दिवस चालणाऱ्या युवा महोत्सवाच्या माध्यमातून विद्यार्थी संगीत, नाट्य, नृत्य, कला आणि वाङ्मय प्रकारात आपले अभिनय सादर करणार आहेत. देशातील ७७ विद्यापीठांचे सुमारे ३०० संघ सहभागी झाले आहेत. सुमारे दीड हजार विद्यार्थ्यांच्या सहभागामुळे युवकांमध्ये जल्लोषाचे वातावरण निर्माण झाला आहे.**

अमित गद्रे



कृष्णा विद्यापीठ, आंध्र

**शिवोत्सवाला मिरवणुकीने सुरुवात झाली. मिरवणुकीमध्ये आपल्या राज्याच्या संस्कृतीचे दर्शन घडविणारा पेहराव करून विद्यार्थ्यांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.**



म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

विविधतेतून एकतेचा संदेश देणाऱ्या ३२ व्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ राष्ट्रीय युवा महोत्सवाला (शिवोत्सव-२०१७) शुक्रवारी जल्लोषी मिरवणुकीने सुरुवात झाली. पारंपरिक वाद्ये, राज्यांची वैशिष्ट्ये दाखविणारे पोशाख आणि वाद्यांचा निनाद असे युवकांचे जल्लोषी वातावरण मिरवणुकीत होते. ‘रोकडविरहित अर्थव्यवस्था : भारतीय अर्थव्यस्थेचे सक्षमीकरण’ या मुख्य विषयाभोवती गुंफलेल्या मिरवणुकीत देशभरातील विविध विद्यापीठांच्या संघांच्या स्पर्धकांनी सहभाग घेतला. देशभरातील राज्यांच्या वैविध्यपूर्ण संस्कृतीचे दर्शन यानिमित्ताने कोल्हापूरकरांना घडले. शिवाजी विद्यापीठाचा माहिती देणारा चित्ररथ मिरवणुकीचे प्रमुख आकर्षण ठरला.

सुहास ठोंबरे, खंडोबा-वेताळ तालीम मर्दानी खेळ आखाड्याच्या मावळ्यांनी चित्तथरारक प्रात्यक्षिके सादर केली. लाठी-काठी, फरीगदगा, बंदाटी, तलवारबाजी अशा प्रात्यक्षिकांनी परराज्यातील स्पर्धकांची मने जिंकली. छत्रपती प्रमिलाराजे रुग्णालयातर्फे एड्सविषयक जनजागृतीपर पथनाट्य सादर केल्यानंतर प्रभारी कुलगुरू डॉ. डी. आर. मोरे यांनी फ्लॅग-ऑफ केल्यानंतर मिरवणुकीला सुरुवात झाली.

मिरवणुकीच्या अग्रभागी विद्यापीठाचा ध्वज धारण करणारा अश्व, त्यापाठोपाठ राजर्षी शाहू कॉलेजचे मुलींचे झांजपथक होते. त्यानंतर विद्यापीठाचा कोल्हापूरची संस्कृती, कृषी, जलवैभव, पुष्प, पक्षी व परंपरेचे दर्शन घडविणारा चित्ररथ होता. गेल्यावर्षीच्या राष्ट्रीय युवा महोत्सवात विजेत्या ठरलेल्या बनारस हिंदू विश्व विद्यालयाच्या संघाला अग्रस्थानाचा मान देण्यात आला. म

रिवणूक सुरू होऊन मुलींचे वसतिगृह, दूरशिक्षण केंद्र, सायबर चौक, बाईचा पुतळा, चांदीचा गणपती, मालती अपार्टमेंट, इंगळे नगरमधून एनसीसी भवनपासून मिरवणूक विद्यापीठ परिसरात दाखल झाली. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, सहसचिव डॉ. सॅम्पसन डेव्हीड, निरीक्षक प्रा. एस. के. शर्मा, अजित चौगुले, डॉ. आर. व्ही. गुरव, राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, उपस्थित होते.



कर्नाटका विद्यापीठ



आसाम विद्यापीठ

### नृत्य, देखावे सादर

केरळ येथील शंकराचार्य कानडी विद्यापीठाने कथ्थकमधील ‘कुदकळळ’ नृत्य सादर केले, तर बिहारच्या ललित नारायण विद्यापीठाने कॅशलेसचे फायदे फलकाच्या स्वरूपात मांडले होते. झारखंड येथील विनोभा भावे विद्यापीठाने नारीशक्तीचा सन्मान करणारा देखावा सादर केला.



### शिवतेजने जागवल्या आठवणी

विद्यापीठाच्या सांस्कृतिक कार्यक्रमात विद्यापीठाचे कर्मचारी आणि खंडोबा-वेताळ तालीम मर्दानी आखाड्याचे वस्ताद सुहास ठोंबर नेहमीच छत्रपती शिवाजी महाराजांच्या वेशभूषेत सहभागी व्हायचे. दोन वर्षांपूर्वी त्यांचे निधन झाले, पण त्यांच्या आखाड्याचे काम सुरूच आहे.

आजच्या युवा महोत्सवात सुहास यांचे चिरंजीव शिवतेज शिवाजी महाराजांच्या वेशात सहभागी झाले होते. ठोंबरे यांचे चिरंजीव असल्याची माहिती मिळताच अनेकजण त्याच्याशी संवाद साधत होते. शिवतेजने तलवार, लाठी-काठीचे प्रात्यक्षिक सादर करत वडिलांच्या आठवणी जागृत केल्या.

### नोटाबंदीतून नवा भारत घडेल...

जम्मू आणि काश्मीर विद्यापीठाने ‘नोटाबंदीतून नवा भारत घडेल’ असा संदेश देणारी कलाकृती सादर केली. नोटाबंदीमुळे सामान्यांना त्रास झाला, असला तरी त्यातून नवा भारत घडेल, असा आशावाद त्यांनी मांडली होता.











(सर्व छाया : पप्पू अत्तार)

# उमटले भारताचे प्रतिबिंब

## तरुणाईकडून भारतीय संस्कृती, कला, पारंपरिक नृत्याचे दर्शन

कोल्हापूर : प्रतिनिधी

**पारंपरिक मणिपुरी नृत्यापासून ते पंजाबचा भांगडा गिद्दापर्यंत...बेटी बचाओ, बेटी पढाओ.. डिजिटल इंडिया, कॅशलेस इंडिया.. से नो करप्शन.. असा संदेश देत देशातील विविध राज्यांतून आलेल्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या वैविध्यपूर्ण कला, संस्कृती, पारंपरिक नृत्याचे दर्शन कोल्हापूरकरांना घडविले. शिवाजी विद्यापीठात चार दिवस रंगणाऱ्या ३२ व्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ युवा महोत्सव 'शिवोत्सव-२०१७'ची सुरुवात देशभरातील तरुणाईच्या जल्लोषी शोभायात्रेने झाली. कोल्हापूरच्या परंपरेसह शिवाजी विद्यापीठाची सर्वांगीण माहिती देणारा चित्ररथ शोभायात्रेचे आकर्षण ठरला.**

### शिवाजी विद्यापीठाच्या प्रांगणात बहुसांस्कृतिक मेळा

### अखिल भारतीय आंतरविद्यापीठ युवा महोत्सव शोभायात्रा

पंजाबी, केरळी, दाक्षिणात्य असे बहुविविध वेशभूषा केलेले देशभरातील सांस्कृतिक वैभव शिवाजी विद्यापीठाच्या प्रांगणात शुक्रवारी अवतरले. नृत्य, गायन, लोककला आदी प्रकारांच्या सादरीकरणासाठी आज सकाळपासून विविध ठिकाणी रंगीत तालीम सुरू होत्या. त्यामुळे दररोज लेक्चर आणि घोकंपट्टीत दिसणारा विद्यापीठाचा कॅम्पस आज एक वेगळ्याच मूडमध्ये दिसला. बहारदार संगीतसूरांच्या वातावरणात विद्यापीठाचे



प्रांगण न्हाऊन निघाल्याचं चित्र होतं.

३२ वा ऑल इंडिया इंटर युनिर्व्हसिटी नॅशनल यूथ फेस्टिव्हल 'शिवोत्सव २०१७' कार्यक्रमांना आजपासून सुरुवात झाली. जवळपास सत्तरहून अधिक विद्यापीठांचे संघ फेस्टिव्हलमध्ये सहभागी झाले असून त्यांनी रितसर नोंदणी केली आहे. आज दुपारपर्यंत दीड हजार विविध राज्यांतील पाहुण्या विद्यार्थ्यांनी परिसर फुलून गेला होता. अनेक ठिकाणी विद्यार्थ्यांचे संघ सादरीकरणासाठी रंगीत तालमीत गुंतले होते. त्यामुळे गायन, नृत्याविष्कार असे संगीताचे प्रकार सर्वत्र सुरू होते.

मुख्य प्रशासकीय इमारतीपासून यानंतर प्रभारी कुलगुरू डॉ. डी. आर. मोरे यांच्या हस्ते फ्लॅग-ऑफ करून शोभायात्रेस प्रारंभ झाला. शोभायात्रेच्या अग्रस्थानी विद्यापीठाचा ध्वज धारण करणारा अश्व आणि त्याच्या पाठोपाठ झांजपथक होते. शिवाजी विद्यापीठाचा चित्ररथ होता. गतवर्षीच्या राष्ट्रीय युवा महोत्सवातील विजेत्या बनारस हिंदू विश्वविद्यालयाच्या संघाला शोभायात्रेच्या अग्रस्थानाचा मान देण्यात आला. त्यापाठोपाठ अन्य विद्यापीठांचे संघ आणि शेवटी यजमान शिवाजी विद्यापीठाचा संघ होता.

पान ४ वर››

### कोल्हापुरी साहसी मर्दानी खेळांची प्रात्यक्षिके

कोल्हापूरच्या सुहासराजे ठोंबरे मर्दानी खेळ आखाडा, खंडोबा तालीम मंडळ यांच्या कलाकारांनी मर्दानी खेळांची प्रात्यक्षिके सादर केली. छत्रपती शिवाजी महाराजांचे बालपण, युद्धकला, दांडपट्टा, लिंबू मारणे, फरी-गजगा, जाळाचे प्रात्यक्षिके करून उपस्थितांवर महाराष्ट्रीय संस्कृती दर्शन घडविले. छत्रपती प्रमिलाराजे रुग्णालयाच्या कलाकारांनी एड्सविषयक जनजागृतीपर पथनाट्याद्वारे जनजागृती केली.

### चित्ररथातून कोल्हापूरचे दर्शन

शोभायात्रेत ऑडिओ-व्हिज्युअल स्वरूपातील चित्ररथामध्ये कोल्हापूरच्या वैविध्यपूर्ण परंपरांचे दर्शन घडविणाऱ्या चित्रफीतींसह शिवाजी विद्यापीठातील जलवैभव, पुष्प व पक्षीवैभवाचे दर्शन घडविणाऱ्या चित्रफीती प्रदर्शित केल्या जात होत्या. शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी बैलगाडीवर कॅशलेस इंडियाची प्रतिकृती करून जागृती केली.

### भर उन्हातही उत्साहात शोभायात्रा

शोभायात्रेस दुपारी चार वाजता सुरुवात झाली. शहरातील प्रमुख मार्गावरून जात असताना कलाकारांबरोबर 'सेल्फी' घेण्याचा मोह आवरला नाही. भर उन्हातही शोभायात्रेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. देशभरातून आलेल्या युवा कलाकारांनी सादर केलेली पारंपरिक नृत्य आणि वेशभूषा याकडे नागरिक कुतुहलाने पाहून टाळ्यांची दाद देत होते.

### विद्यार्थ्यांना कोल्हापुरी जेवणाची मेजवाणी

गुरुवारी रात्रीपासून जेवण, नाष्टा, चहाची सुविधा विद्यापीठाने केली आहे. अॅनेक्स इमारतीसमोरील जागेत भव्य मंडप घालण्यात आला आहे. या ठिकाणी जेवण, नाष्ट्याची सोय करण्यात आली आहे. बाजरीची भाकरी, खर्डा, कांदा, ताक, पुरी, विविध भाज्या असे दरदिवशी वेगळे मेनू विद्यार्थ्यांना दिले जात आहेत. रविवारी कोल्हापुरी पद्धतीचा तांबडा, पांढऱ्याचाही बेत असणार आहे. बाहेरील विद्यार्थ्यांची जेवणाची हेळसांड होऊ नये, यासाठी भोजन कमिटी दक्ष ठेवण्यात आली.

### रंगीबेरंगी वेशभूषा

राज्यातील संस्कृतीनुसार विद्यार्थ्यांच्या वेशभूषा असल्याने कॅम्पसमध्ये रंगीबेरंगी फुलपाखरांचा मेळा असल्यासारखे वातावरण दिसत आहे.

# उमटले भारताचे प्रतिबिंब

(पान १ वरुन) तेजपूर युनिव्हर्सिटी आसामच्या विद्यार्थ्यांनी गाजिरंगा नॅशनल पार्क, टी-गार्डन, बेल मेटलचा व्यवसाय कॅशलेस झाल्याचे विविध गोष्टीद्वारे सादरीकरण केले. चंदीगड विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी 'आया नया दौर' या गीताच्या माध्यमातून पे डिजिटलचा नारा दिला. केरळच्या श्री शंकराचार्य कानडी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी 'कदकळ' पारंपरिक नृत्य, रांची विश्वविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी 'झुमर' नृत्य तर पंजाबच्या लव्हली युनिव्हर्सिटी भांगडा करीत इतरांना नृत्यावर व संगीताच्या तालावर ठेका धरायला लावला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी चेहरे रंगवून 'फ्री इंडिया, से नो करप्शन, फाईट अगेंस्ट करप्शन'चा संदेश दिला. हजारीबागच्या विनोबा भावे विश्वविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी घोषणा देत 'बेटी बचाओ, बेटी पढाओ'चा नारा दिला. शोभा यात्रेत एसएनडीटी विद्यापीठ मुंबई, रविशंकर युनिव्हर्सिटी रायपूर, वीर नर्मद साऊथ गुजरात विद्यापीठ गुजरात, युनिव्हर्सिटी ऑफ म्हैसूर, मणिपूर युनिव्हर्सिटी इंफाळ, एल.एन.मिथला विद्यापीठ, दरगंबा, बिहार, कुरुक्षेत्र विश्वविद्यालय, हरियाणा, डॉ. हरिसिंह गौर केंद्रीय विश्वविद्यालय उत्तर प्रदेश, सेंट्रल युनिव्हर्सिटी राज्यस्थान आदी राज्यांतील संघ शोभायात्रेत सहभागी झाले होते.

विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीपासून शोभायात्रा सुरू होऊन लोककला केंद्रात शोभायात्रेचा समारोप झाला. सीपीआरचा व शिवाजी विद्यापीठाच्या आरोग्य केंद्राचा चमू आणि त्यांचा एड्स जगजागृतीविषयक चित्ररथ आदींचा समावेश होता. शोभायात्रेत उत्तम प्रदर्शन करणाऱ्या संघांमधूनही तीन विजेत्या संघांची निवड करण्यात येणार आहे. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, एआययूचे सहसचिव डॉ. सॅम्पसन डेव्हीड, एआययूचे निरीक्षक प्रा. एस.के. शर्मा, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, परीक्षा नियंत्रक महेश काकडे, विद्यार्थी कल्याण संचालक डॉ. आर.व्ही. गुरव, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड आदी उपस्थित होते.














## » विद्यार्थ्यांकडून डिजिटल ते कॅशलेस इकॉनॉमीचा संदेश

'कॅशलेस इकॉनॉमी, डिजिटल इंडिया, पे डिजिटल या मुख्य विषयाच्या अनुषंगाने देशभरातील विद्यार्थ्यांनी सादरीकरण केले. पंजाब युनिव्हर्सिटीने पे डिजिटल, युनिव्हर्सिटी ऑफ जम्मूच्या विद्यार्थ्यांनी कॅशलेस ट्रान्जिक्शन, हरियाणाच्या कुरुक्षेत्र विश्वविद्यालयाने डिजिटल इंडियाचा संदेश दिला.

## » स्वागत कक्ष, चौकशी कक्ष

विद्यापीठात संघ दाखल होत असताना कॅम्पसमध्ये स्वागत कक्ष, चौकशी कक्ष विद्यार्थ्यांना सहकार्य करण्यासाठी सज्ज होते. रस्त्यांवर ठिकठिकाणी एनसीसी, एनएनएसची पथके मार्गदर्शन करताना दिसत होती. त्यामुळे विद्यार्थ्यांना फारशी अडचण दिसत नव्हती.

## » राहण्याची सुविधा

हॉस्टेल्स तसेच काही विभागांच्या वर्गात विद्यार्थ्यांच्या राहण्याची सोय करण्यात आली आहे. अपेक्षेपेक्षा जास्त विद्यार्थी आल्यामुळे राहण्यासाठी अतिरिक्त सोय प्रशासनाला करावी लागली आहे.

## » कार्यक्रमासाठी पाच ठिकाणे

दररोज होणाऱ्या कार्यक्रमासाठी मुख्य व्यासपीठ हे लोककला सभागृह असणार आहे. तसेच इतर कार्यक्रमांसाठी चार व्यासपीठांवर सादरीकरण केले जाणार आहे.

## » विद्यार्थ्यांची राहण्याची कॅम्पसमध्ये सुविधा

मोठ्या संख्येने महोत्सवासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या राहण्याची सुविधा विद्यापीठाच्या कॅम्पसमध्येच करण्यात आली आहे. तसेच नाष्टा, जेवण यासाठीही कॅम्पसमध्ये विविध विभागात नियोजन करण्यात आले आहे.

## » सुरक्षेला प्राधान्य

विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचे नियोजन करण्यात आले आहे. विद्यापीठाचा सुरक्षा विभाग, एनसीसी, एनएसएसचे विद्यार्थी पथक तसेच पोलिसांचेही सहकार्य घेण्यात आले असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली.

## » समित्यांचे नियंत्रण

भोजन, निवासी, संरक्षण, कॅम्पस नियंत्रण, समन्वय, प्रसिद्धी, तक्रारी, सूचना आदी सव्वीस प्रकारच्या समित्या कार्यरत आहेत. या समितीचे प्रमुख प्रभारी कुलगुरू डॉ. डी. आर. मोरे असून आज दिवसभर कमिट्यांची धावपळ दिसून आली. ब्लेझर, टाय असा कमिटी सदस्यांना ड्रेसकोड दिसून आला.

# दहशतवाद से हम लढ रहे है, हमारा साथ दो..

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

दहशतवाद से हम लढ रहे है, हमारा साथ दो..जम्मू काश्मीर में दहशत गर्दी नही है, आपका तहेदिलसे स्वागत ही होगा.. अशा भावना अखिल भारतीय आंतर- विद्यापीठ राष्ट्रीय युवा महोत्सवाच्या निमित्ताने शिवाजी विद्यापीठात आलेल्या युनिव्हर्सिटी ऑफ जम्मूच्या विद्यार्थिनी रिचा शर्मा व श्रुती शर्मा यांनी व्यक्त केल्या.

शिवाजी विद्यापीठात ३२ व्या अखिल भारतीय आंतर-विद्यापीठ युवा महोत्सवाच्या निमित्ताने देशभरातील विविध राज्यांतील विद्यापीठाचे निवडक संघ आले आहेत. यावेळी काश्मिरी विद्यार्थिनींनी भावनांना वाट करून दिली.

जम्मू काश्मीरमध्ये नेहमीच दहशतीच्या छायेखाली राहिला आहे. आता ही परिस्थिती बदलत चालली आहे. मुली शिक्षणाच्या प्रवाहात आल्या आहेत.

दहशतवाद संपविण्यासाठी सरकार, समाजाचे प्रयत्न सुरू आहेत. काश्मीर देशाचा स्वर्ग आहे, याठिकाणी आलात तर आपले मनापासून स्वागतच होईल, असा आशावादही त्यांनी व्यक्त केला.

आंतरविद्यापीठ युवा महोत्सवाच्या निमित्ताने आलेल्या मणिपूर, आसाम, पंजाबच्या विद्यार्थ्यांनी राजर्षी शाहू महाराजांचे कार्य, कोल्हापुरी चप्पल, तांबडा-पांढरा रस्सा ते कोल्हापूर संस्कृती कौतुक करीत ती वेगळी असल्याचे सांगितले. परत जाताना मराठी भाषा, महाराष्ट्राची संस्कृतीमधील चांगल्या गोष्टी बरोबर घेऊन त्या इतरांना सांगणार असल्याचे विद्यार्थ्यांनी सांगितले.

## ‘शिवोत्सव’च्या निमित्ताने काश्मिरी विद्यार्थिनींनी व्यक्त केल्या भावना

“ कोल्हापूरचे लोक चांगले आहेत, त्यांना भेटल्यानंतर आपलेपणाची भावना निर्माण झाली. कोल्हापुरी चप्पल, जेवण आणि येथील नियम वेगळे आहेत. लोक आदराची वागणूक देतात, हे पाहून आंनद वाटला.

– **जतीन सैनी**, पंजाब युनिव्हर्सिटी

“ युवा महोत्सवामुळे देशभरातील संस्कृतीची ओळख झाली. यातून चांगल्या गोष्टी शिकायला मिळाल्या. मणिपूरसारखेच डोंगर, घाट, निसर्ग महाराष्ट्रात येताना पाहिला मिळाल्याने आपल्याच गावात असल्यासारखे वाटले. ऐतिहासिक वास्तू पाहून येथील संस्कृती जाणून घेण्याचा प्रयत्न करणार आहे.

– **निरीना येमबेम**, मणिपूर युनिव्हर्सिटी




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या लोककला केंद्र सभागृहात शुक्रवारी ३२ व्या ऑल इंडिया इंटर युनिव्हर्सिटी नॅशनल यूथ फेस्टिव्हल 'शिवोत्सव२०१७'चा शुभारंभ रोपट्यास पाणी घालून करताना शाहू महाराज. यावेळी व्यासपीठावर डॉ. सॅम्पसन डेव्हिड, डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. डी. आर. मोरे, डॉ. एस. के. शर्मा, सचिन खेडेकर आदी मान्यवर. (वृत्त पान ३ वर) (छाया : पप्पू अत्तार)

# 'शिवोत्सव' नॅशनल यूथ फेस्टिव्हलला जल्लोषात प्रारंभ

## शिक्षकांना मार्गदर्शक बनवा म्हणजे मोठे व्हाल : सचिन खेडेकर; तरुण हा देशाचा कणा : शाहू महाराज

### विद्यापीठाकडून कोल्हापूरचे 'ब्रँडिंग'

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

'शिवोत्सव २०१७' म्हणजेच ३२ व्या ऑल इंडिया इंटर युनिव्हर्सिटी नॅशनल यूथ फेस्टिव्हलला शुक्रवारी सायंकाळी जल्लोषात प्रारंभ झाला. आपण तरुण कलाकार आहात. उत्तम कलाकार होण्यासाठी शिक्षण आणि प्रॅक्टीस असावीच लागते. त्यामुळे सोशल मीडियावरून उसनवारी करण्यापेक्षा आपल्या शिक्षकांना मार्गदर्शक बनवा आणि खूप मोठे व्हा, असे आवाहन सिने अभिनेते सचिन खेडेकर यांनी यावेळी केले. तरुण हा देशाचा कणा आहे. तो देशाचे भविष्य आहे. या नव्या पिढीचा उत्साह आणि जोश देशाच्या विकासासाठी आशावादी असल्याचे प्रतिपादन शाहू महाराज यांनी यावेळी व्यक्त केले.

उत्साह, जोश आणि जल्लोषाने भारलेल्या वातावरणात सायंकाळी शिवाजी विद्यापीठाच्या लोककला केंद्र सभागृहात 'शिवोत्सव २०१७' म्हणजेच ३२ व्या ऑल इंडिया इंटर युनिव्हर्सिटी नॅशनल यूथ फेस्टिव्हलचा प्रारंभ शाहू महाराज व अभिनेते सचिन खेडेकर यांनी रोपट्यास पाणी घालून केला. यावेळी ते बोलत होते.

सिने अभिनेते खेडेकर बोलण्यास उभे राहिल्यावर विद्यार्थ्यांनी प्रचंड जल्लोष करून त्यांना दाद दिली. यावेळी खेडेकर यांनी हिंदीतून भाषणास सुरुवात केली. ते म्हणाले, यूथ फेस्टिव्हल ही माझ्यासाठी नवीन गोष्ट नाही. कारण मी विद्यार्थी दशेतील कॉलेजच्या वादविवाद स्पर्धेतूनच इथंपर्यंत आलो आहे. त्यामुळे मी माझ्या यशाचे सगळे श्रेय हे अशा फेस्टिव्हललाच देतो. मुंबई युनिव्हर्सिटीत असताना जो उत्साह माझ्यात होता तो आजही मी कायम ठेवण्याचा प्रयत्न करतोय. याचे कारण कॉलेजमध्ये असताना मी स्पर्धांमध्ये मिळवलेली सगळी मेडल्स मी अजूनही इतर सर्व पुरस्कारांच्या सर्वांत वर ठेवली आहेत. त्यामुळेच मी अजूनही या वयात उत्साही असतो. आजचा तरुण खूप हुशार आहे; परंतु त्यांची सोशल मीडियावरून दुसऱ्यांच्या गोष्टींची उसनवारी सुरू असते. माझा अनुभव सांगतोय की, तरुणांनी शिक्षकांना मार्गदर्शक मानल्यास खूप यश मिळू शकते. विद्यापीठातील नाट्यशास्त्र विभाग ही संपत्ती असल्याचे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांना शिक्षण आणि प्रॅक्टीसची कास धरावी, असे आवाहन केले. माझे स्माईल खूप छान आहे, असे व्यासपीठावरील मान्यवर मला कानात सांगत होते. राग आणावा लागतो. त्यासाठी कष्ट पडतात; परंतु स्माईल सहज चेहऱ्यावर आणता येते. त्यामुळे यश मिळाले तरी आणि अपयश आले तरी चेहऱ्यावर स्माईल कायम ठेवा, असा सल्ला त्यांनी दिला. यावेळी 'हार के फिर जीत सकते हो!' अशा शायरी अंदाजात त्यांनी विद्यार्थ्यांना आत्मविश्वास दिला. खेडेकर बोलत असताना त्यांच्या 'मी शिवाजीराजे भोसले बोलतोय' या चित्रपटाच्या संदर्भाने विद्यार्थ्यांकडून 'जय शिवाजी, जय भवानी'च्या घोषणा सुरू होत्या.

शाहू महाराज म्हणाले, आपल्या देशात प्रत्येक राज्यात वेगवेगळी संस्कृती नांदते. ही संस्कृतीची विविधता जगात आपले वेगळेपण दर्शविते. या बहुविविध संस्कृतीचे वैभव हे जगासाठी उत्तम उदाहरण आहे. आपण सर्वांनीच एकमेकांच्या संस्कृतीचा आदर केला पाहिजे. आपली संस्कृतीचे धर्मनिरपेक्षता हे वैशिष्ट्य आहे. तरुण हे देशाचे भविष्य असल्याचे त्यांनी सांगितले.

एआययू नवी दिल्लीचे सहसचिव डॉ. सॅम्पसन डेव्हीड यांनीही जोशपूर्ण भाषण केले. आपली बहुविविधता असणारी संस्कृती आनंददायी आहे. माणसाच्या आयुष्यात बालपण, तरुणपण आणि वृद्धावस्था असते. यामध्ये तरुण वयात माणूस आत्मविश्वासाने भारलेला असतो. त्यामुळे देश आणि जगाच्या इतिहासासाठी चांगले काम करा, असे आवाहन त्यांनी केले. शिवाजी विद्यापीठाचे कॅम्पस खूबसूरत असल्याचे त्यांनी म्हणताच विद्यार्थ्यांनी टाळ्या-शिट्टयांनी त्याला दाद दिली.

प्रभारी कुलगुरू डॉ. डी. आर. मोरे यांनी विद्यापीठाच्या प्रगतीचा आढावा घेतला. त्यांनी भाषणाच्या सुरुवातीस कोल्हापूरची पोरं दंगा करत नाहीत, असे म्हणताच मुलांनी जल्लोष करत दाद दिली. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर व विद्यार्थी कल्याणचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी विद्यापीठाच्या प्रगतीचा आलेख सांगितला. यावेळी एआययूचे निरीक्षक एस. के. शर्मा, परीक्षा नियंत्रक महेश काकडे, पी. टी. गायकवाड, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले आदींसह मान्यवर उपस्थित होते.

**विद्यापीठ कॅम्पसमध्ये वायफाय फ्री**

यूथ फेस्टिव्हलच्या निमित्ताने शिवाजी विद्यापीठात देशभरातील विद्यापीठांतून दोन हजार विद्यार्थी आले आहेत. फेस्टिव्हलच्या निमित्ताने एकूण दहा हजार विद्यार्थी कॅम्पसमध्ये असणार आहेत. या विद्यार्थ्यांसाठी फेस्टिव्हलच्या काळात कॅम्पसमध्ये वायफाय फ्री असणार आहे.

**कोल्हापूरचे जोरदार ब्रँडिंग**

देशभरातील विद्यापीठांतून विद्यार्थी यूथ फेस्टिव्हलसाठी आले असल्याची संधी साधून कुलसचिव डॉ. नांदवडेकर, विद्यार्थी कल्याणचे संचालक डॉ. गुरव यांनी कोल्हापूरची प्राचीन, ऐतिहासिक, धार्मिक आणि पुरोगामी ओळख सांगत येथील खाद्यसंस्कृती व पर्यटनस्थळांचाही उल्लेख केला.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या लोककला केंद्र सभागृहात शुक्रवारी ३२ व्या ऑल इंडिया इंटर युनिव्हर्सिटी नॅशनल यूथ फेस्टिव्हल 'शिवोत्सव २०१७' च्या उद्घाटन कार्यक्रमास विद्यार्थ्यांची अशी मोठी गर्दी जमली. (छाया : पप्पू अत्तार)

### सभामंडपाची आकर्षक सजावट

राष्ट्रीय युवा महोत्सवातील कलाप्रकारांचे पाच सभागृहात सादरीकरण होणार आहे. या सर्वच सभागृहांमध्ये आकर्षक लायटिंग, स्टेज सजावट, खुर्च्यांची मांडणी करण्यात आली आहे. लोककला केंद्र, भाषा भवन वि. स. खांडेकर सभागृह, संगीत विभाग, वनस्पतीशास्त्र निलांबरी सभागृह, मानव्यशास्त्र सभागृह आदी ठिकाणी कलाअविष्कारांचे सादरीकरण होणार आहे.

### कोल्हापुरी फेट्याने घातली भुरळ

राष्ट्रीय युवा महोत्सवासाठी विद्यापीठाच्या कॅम्पसमध्ये अनेक विद्यापीठांनी शुक्रवारी हजेरी लावली. ढोल-ताशांचा दणदणाट, हालगी-लेझमाच्या ठेका, कोल्हापुरी फेटा बांधून मोठ्या जल्लोषी स्वागत करण्यात आले. कोल्हापुरी फेट्याने उपस्थितांना चांगलीच भुरळ घातली होती. लोककला केंद्र येथील सभागृहात कोल्हापुरी फेट्यांची गर्दी दिसत होती.

### कोल्हापुरी स्वागताने भारावले विद्यार्थी

विविध विद्यापीठांचे संघ शोभायात्रेच्या माध्यमातून परत उद्घाटन कार्यक्रमासाठी लोककला केंद्र सभागृहात येत असताना त्यांचे झांजपथकाच्या गजरात जोरदार स्वागत करण्यात आले. यावेळी त्यांना दुतर्फा उपस्थितांकडून दाद दिली जात होती. या स्वागताने हे पाहुणे विद्यार्थी भारावून गेले. शिवाजी विद्यापीठाचे लोककला केंद्रात आगमन होताच शिवाजी महाराज की जय... अशा जोरदार घोषणा देण्यात आल्या. यावेळी मावळ्याच्या वेषातील घोडेस्वाराने थेट घोडा स्टेजवर आणला.

### चोख बंदोबस्त

महोत्सवाचा आनंद लुटण्यासाठी युवक -युवतींची होणारी गर्दी लक्षात घेऊन, विद्यापीठ परिसरात अनुचित प्रकार घडू नये म्हणून कॅम्पस परिसरात मोठा पोलिस बंदोबस्त व सिक्युरिटी तैनात ठेवली आहे.

### महाराष्ट्र लोककला दर्शन

उद्घाटनाच्या कार्यक्रमानंतर महाराष्ट्र लोककलांचे सादरीकरण करण्यात आले. सुरुवात पहाटेच्या भूपाळीने झाली. यानंतर 'जय जय महाराष्ट्र' हे गीत सुरू झाल्यावर तरुणाईने प्रचंड जल्लोष केला. मर्दानी खेळाच्या सादरीकरणालाही यावेळी दाद मिळाली. कोळी गीते, धनगरी गीते, भक्तिगीते आदींसह जय मल्हार गीत सादर करण्यात आले. प्रभो, शिवाजी राजा या गीतावर शिवराज्याभिषेक सादर करण्यात आला. यानंतर कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. महाराष्ट्राच्या संस्कृतीचे अंतरंगच्या वतीने पंचवीस कलाकारांसह सादरीकरण करण्यात आले.



# शिवोत्सव शिवाजी विद्यापीठाचा...




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या शिवोत्सवामध्ये शोभायात्रेत सहभागी झालेल्या युवक-युवतींनी भारतीय संस्कृतीचे दर्शन घडवले. (वृत्त पान ११ वर) (छाया : एस. अली)

# संस्कृती हा देशाचा कणा

## श्रीमंत शाहू महाराज : शिवाजी विद्यापीठात शिवोत्सवास प्रारंभ

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत विस्तीर्ण पसरलेल्या भारत देशामध्ये संस्कृतीमध्ये विविधता आढळते. प्रत्येक प्रांताची संस्कृती जरी भिन्न असली तरी विविधतेत एकता आहे. देशाची संस्कृती हाच देशाचा कणा आहे, असे प्रतिपादन श्रीमंत शाहू महाराज यांनी केले. ते शिवाजी विद्यापीठात शिवोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते. विद्यापीठात शुक्रवारपासून ३२ व्या राष्ट्रीय युवा महोत्सवास सुरुवात झाली. यावेळी अभिनेते सचिन खेडेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

श्रीमंत शाहू महाराज म्हणाले, कोल्हापूर ही कालनागरी म्हणून सर्वत्र प्रसिद्ध आहे. राजर्षी शाहू महाराजांनी सामाजिक परिवर्तनाबरोबर कलेला राजाश्रय दिला. आजही या कला सुरु आहेत. भारत हा संस्कृतिकदृष्ट्या संपन्न असा देश आहे. भारत हे जगातील सांस्कृतिक एकतेचे उत्कृष्ट उदाहरण आहे. या राष्ट्रीय युवा महोत्सवाच्या माध्यमातून युवकांना स्वतःची कला सादर करता येते, तसेच विविध संस्कृतीचेही दर्शन घडते. युवा महोत्सवाच्या माध्यमातून संस्कृतीची देवाणघेवाण होणार आहे. भारताचा स्वभावधर्म हा धर्मनिरपेक्षतेचा आहे. त्याचे प्रतिबिंब युवा महोतवातून घडले पाहिजे. देशभरातून आलेल्या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्राच्या संस्कृतीची ओळख करून घ्यावी, असे अवाहनही श्रीमंत शाहू महाराजांनी केले.

अभिनेते सचिन खेडेकर म्हणाले, माझ्या आयुष्याची सुरुवात आंतरविद्यापीठीय चर्चासत्रातून झाली आहे. विद्यापीठातील काळात मिळवलेल्या कौशल्यांमुळे अभिनेता बनू शकलो. त्या काळात शिक्षकच माझ्यासाठी सर्वकाही होते. सध्याचे विद्यार्थी हे सोशल मीडियाच्या माध्यमातून जगभरातील ज्ञान सहजगत्या मिळवतात; मात्र त्यांनी शिक्षकांना महत्त्व दिल्यास त्यांना अधिक यश मिळेल. जगातील प्रत्येक कला शिकता येते. विद्यापीठांमध्ये असणारे नाट्यशास्त्र विभाग हे फार मोठी संधी आहे. तरुणांशी संवाद साधण्यासाठीच या कार्यक्रमाला आलो आहे. आज जरी यश मिळाले नाही तरी भविष्यात जिंकण्याची संधी अनेकदा येईल. त्यामुळे महोत्सवात जिंकण्यासाठी प्रयत्न कराच, तर पुढेही कष्टाने यश संपादन करण्यासाठी मेहनत करा.

यावेळी एआययूचे सहसचिव डॉ. सॅम्पसन डेव्हिड म्हणाले, देशातील संस्कृती एकाच व्यासपीठावर युवा महोत्सवाच्या माध्यमातून आली आहे. तरुणांनी सृजनशील गोष्टी कराव्यात. युवा महोत्सवात समाविष्ट झालेले विद्यार्थी प्रांताप्रांतांच्या संस्कृतीचे राजदूत बनून आपल्याबरोबर देशभरातील संस्कृती घेऊन जातील.

कार्यक्रमाचे स्वागत विद्यार्थी कल्याण संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी केले, तर प्रास्ताविक कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी केले. यावेळी एआययूचे निरीक्षक प्रा. एस. के. शर्मा, प्रभारी कुलगुरू डॉ. डी. आर. मोरे, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, परीक्षा नियंत्रक महेश काकडे, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड यांची उपस्थिती होती.




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात शिवोत्सवाचे रोपट्याला पाणी घालून उद्घाटन करताना श्रीमंत शाहू महाराज, अभिनेते सचिन खेडेकर, एआययूचे सहसचिव डॉ. सॅम्पसन डेव्हिड, प्रभारी कुलगुरू डॉ. डी. आर मोरे आदी.** (छाया : एस. अली)

महाराष्ट्राच्या संस्कृतीचे दर्शन

शिवमहोत्सवाच्या उद्घाटनावेळी पार पडलेल्या बहारदार कार्यक्रमात मराठमोळ्या परंपरेचे दर्शन घडविण्यात आले. कोल्हापूरच्या कलाकारांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला. कार्यक्रमाची सुरुवात जय जय महाराष्ट्र माझा या गीताने झाली, तर ओवी, भूपाळी, वासुदेव, लावणी, भारुड आदी कलाप्रकार सादर करण्यात आले. झुंजूमुंजू पहाट आली, जीवाशिवाची बैलजोड, ललाटी भंडार, माऊली माऊली आदी गीते सादर करण्यात आली. सांस्कृतिक कार्यक्रमाचा समारोप छत्रपती शिवारायांच्या राज्याभिषेकाने झाला.







(सर्व छाया : एस. अली)

# 'गो कॅशलेस'

## युवक-युवतींनी भारतीय संस्कृतीचे दर्शन घडवत शोभायात्रेत दिला संदेश










**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

आसामी विद्यार्थ्यांचा पारंपरिक पेहराव, पंजाबच्या विद्यार्थ्यांचा भांगडा, दाक्षिणी वाद्यांच्या तालावर थिरकणारे विद्यार्थी व कॅशलेस ईंडियाचा नारा अशा उत्साहपूर्ण वातावरणात विद्यापीठ परिसर बहरून गेला. शोभायात्रेत देशभरातून सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी भारतीय संस्कृतीच्या विविधेचे, एकतेचे दर्शन घडवले. निमित्त होते शिवाजी विद्यापीठाच्या ३२ व्या आंतरविद्यापीठा युवा महोत्सवाचे.

युवा महोत्सवाची सुरुवात शुक्रवारी शोभायात्रेने करण्यात आली. प्रभारी कुलगुरू डॉ. डी. आर. मोरे यांच्या हस्ते व कुलसचिव विलास नांदवडेकर यांच्या उपस्थितीत विद्यापीठाच्या मुख्य इमारतीजवळ दुपारी ३ वाजता या शोभायात्रेला प्रारंभ झाला. नोटाबंदी व कॅशलेस इंडिया या थिमवर विविध विद्यापीठांचे चित्ररथ शोभायात्रेत सहभागी झाले होते.

देशाच्या विविध भागातून आलेले विद्यार्थी पारंपरिक वेशभूषेमध्ये या यात्रेत सहभागी झाले होते. गतवर्षीच्या विजेत्या हिंदू बनारस विश्वविद्यालयाच्या संघाला शोभायात्रेत अग्रस्थान देण्यात आले होते. प्रारंभी खंडोबा तालीम व सुहासराजे ठोंबरे मर्दानी खेळ आखाड्यातर्फे मर्दानी खेळाची प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. शोभायात्रेत झारखंड येथून आलेल्या विनोबा भावे विद्यापीठाचा विद्यार्थ्यांनी नारीशक्ती हा संदेश देत सहभाग नोंदवला. आसामच्या तेजपुरा विद्यापीठाने कॅशलेस इंडिया व ग्रामीण बँकेचा सजीव देखावा आपल्या वेशभूषेतून सादर केला. बिहारच्या ललित नारायण मिथिला विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी डिजिटल फलकातून कॅशलेसचे फायदे विशद केले. जम्मू विद्यापीठाने ब्लॅकमनी,

**SHIVOTSAV-2017**

कॅशलेस रॅलीच्या देखाव्यातून नोटाबंदी निर्णयाचे स्वागत केले. सहभागी प्रत्येक विद्यापीठाने नोटाबंदी, कॅशलेस इंडिया, डिजिटल इंडियाचे दर्शन आपल्या चित्ररथातून दाखवले. अनेक विद्यार्थ्यांनी डिजिटल फलकातून, रंगीत बॅनरमधून ब्लॅक मनीचे दुष्परिणाम विशद केले. काहींनी नोटाबंदीच्या निर्णयाचे स्वागत केले. आंध्रच्या कृष्णा विद्यापीठ, म्हैसूर विद्यापीठ, शंकराचार्य कानडी विद्यापीठ अशा विद्यापीठांनी आपल्या प्रांताची व संस्कृतीची झलक नृत्यातून दाखवली. यजमान शिवाजी विद्यापीठाने ब्लॅक मनीचा राक्षस बैलगाडीतून शोभायात्रेत आणला होता. तसेच सीपीआर व जिल्हा एड्स नियंत्रण पथकाकडून एड्स नियंत्रण जनजागृती करण्यात आली. ही शोभायात्रा सायबर चौक, बाईचा पुतळा, एनसीसी कार्यालयमार्गे पुन्हा विद्यापीठात येऊन विसर्जित करण्यात आली.

यावेळी परीक्षा नियंत्रक महेश काकडे, लेखा अधिकारी अजित चौगुले, डेव्हिड सॅमसन, आर. व्ही. गुरव, डी. के. गायकवाड, पी. टी. गायकवाड आदी उपस्थित होते.














कोल्हापूर : विद्यापीठात देशभरातून दाखल झालेल्या तरुणाईचा उत्साह ओसंडत होता. (सर्व छाया : एस. अली)


# सांस्कृतिक वैभवाचे दर्शन

## राष्ट्रीय युवा महोत्सवात ७० विद्यापीठांतील विद्यार्थ्यांचा समावेश

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठाचा हिरवागार परिसर शुक्रवारी विविध रंगांनी रंगून गेला. निमित्त आहे शिवाजी विद्यापीठात होत असलेल्या राष्ट्रीय युवा महोत्सवाचे. महोत्सवासाठी देशभरातील ७० विद्यापीठांतील विद्यार्थी- विद्यार्थिनींनी सहभाग घेतला आहे. या पारंपरिक वेशातील तरुणाईने देशातील सांस्कृतिक वैभव विद्यापीठात एकवटले आहे.

शुक्रवारपासून शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय युवा महोत्सव सुरू झाला. महोत्सवासाठी देशभरातील तरुणाई विद्यापीठात दाखल झाली आहे. यामध्ये तामीळनाडू, उत्तर प्रदेश, राजस्थान,



**विविध ढंगात आलेले विद्यार्थी उपस्थितांचे लक्ष वेधून घेत होते.**

केरळ, मध्यप्रदेश, हरियाणा, पंजाब, झारखंड, गुजरात, आदी राज्यातील विद्यार्थी-विद्यार्थिनींचा समावेश आहे. ते आपआपल्या प्रदेशाचा पारंपरिक पेहराव करून आली आहेत. जवळपास देशभरातील तरुणाई असे आपल्या प्रांतांचे दर्शन घडवणारे पोशाख घालून विद्यापीठात दाखल झाल्याने अवघा देश विद्यापीठात दाखल झाल्याचे दिसत आहे.

उत्साह, ईर्षा, कुतूहल असे संमिश्र भाव सहभागी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर दिसत आहेत. तसेच कोल्हापूर व महाराष्ट्राविषयी माहिती घेण्याची धडपडही काही विद्यार्थी करीत आहेत. तर संघातील काही तरुण नोंदणी करून पुढील प्रक्रियेची माहिती घेत होते. विद्यापीठाच्या परिसरात ३२ राष्ट्रीय युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवासाठी देशभरातून दीड हजार

▶▶ पान २ वर



कोल्हापूर : शिवोत्सव २०१७ अतर्गत शुक्रवारी काढण्यात आलेल्या शोभायात्रेत शिवाजी विद्यापीठाचा चित्ररथ आकर्षक ठरला. (संजय देसाई : सकाळ छायाचित्रसेवा)

# जल्लोषात अवतरली देशभरातील संस्कृती

## शिवोत्सवाची धूम : ७७ विद्यापीठांनी काढली शोभायात्रा

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १० : तरुणाईच्या जल्लोषात देशभरातील विविध राज्यांतील संस्कृती आज येथे अवतरली. ढोल-ताशांच्या कडकडाटात भांगडा नृत्य सादर करत 'पंजाब दा पुतरां'नी उपस्थितांची मने जिंकली. केरळचे पारंपरिक तय्यैम व म्हैसूर विद्यापीठाने सादर केलेले कुनिथा नृत्य प्रकाराने शोभायात्रेची उंची वाढवली; तर गुवाहाटी, मणिपूर, तेजपूर व कृष्णा विद्यापीठाने पारंपरिक वेशभूषेने वाहवा मिळविली. निमित्त होते शिवाजी विद्यापीठातर्फे आयोजित शिवोत्सव महोत्सवाचे. 'रोकडविरहित आर्थिक व्यवहार : भारतीय अर्थव्यवस्थेचे सक्षमीकरण' असा संदेश देत ७७ विद्यापीठांनी काढलेली शोभायात्रा लक्षवेधी ठरली.



बीसीयूडीचे संचालक डॉ. डी. आर. मोरे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, परीक्षा नियंत्रक महेश काकडे, वित्त व लेखाधिकारी डॉ. अजित चौगुले यांच्या प्रमुख उपस्थितीत शोभायात्रेस सुरवात झाली. विद्यापीठाच्या मुख्य इमारतीपासून शोभायात्रेस सुरवात होताच राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालयाच्या झांजपथकाचा ठेका सुरू झाला. विद्यापीठाचा घोड्यावरील ध्वजधारीच्या मागे गतवर्षी राष्ट्रीय युवा महोत्सवात विजेत्या ठरलेल्या बनारस विद्यापीठाला मान देण्यात आला होता. त्यानंतर आंध्र प्रदेश, तमिळनाडू, मध्यप्रदेश, राजस्थान, पंजाबमधील विद्यापीठाचे विद्यार्थी होते. त्यांच्या चेहऱ्यावर उत्साह ओसंडून वाहत होता.

### शिवाजी विद्यापीठाचा चित्ररथ आकर्षण

**शिवाजी विद्यापीठाचा ऑडिओ-व्हिज्युअल चित्ररथ शोभायात्रेत होता. कोल्हापूर जिल्ह्यातील गडकिल्ले, राजर्षी छत्रपती शाहू, धार्मिक स्थळे, पक्षी व जलवैभव यांचे चित्रण त्यावर केले होते. हा चित्ररथ शोभायात्रेत आकर्षण ठरला.**

पंजाब विद्यापीठाचे विद्यार्थी भांगडा नृत्य सादर करतच पुढे जात होते. जामिया विद्यापीठाचे विद्यार्थी घोषणा देत होते, तर देवी अहल्यादेवी विद्यापीठाचे विद्यार्थी पारंपरिक वेशभूषेत सहभागी झाले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे विद्यार्थी भ्रष्टाचारमुक्त भारत असा संदेश देत होते. गुवाहाटी विद्यापीठाचे विद्यार्थ्यांचा पारंपरिक वेशभूषेतील सहभाग आकर्षण ठरला. मणीपूरचे विद्यार्थीही खास मणीपुरी वेशभूषेत होते. म्हैसूर विद्यापीठाचे विद्यार्थी कुनिथा नृत्य प्रकारातील वेशभूषेत पारंपरिक वाद्यांच्या गजरात सहभागी झाले होते. आंध्र प्रदेशमधील कृष्णा विद्यापीठाने पारंपरिक ताशाच्या कडकडाटात आदिवासी नृत्य सादर केले. लव्हली प्रोफेशनल विद्यापीठाच्यिा विद्यार्थ्यांनी भांगडा नृत्य सादर करत उपस्थितांचे लक्ष वेधले. दूरशिक्षण विभाग, सायबर चौक, सागरमाळ, मालती अपार्टमेंट, एनसीसी ऑफिस ते पुन्हा लोककला केंद्र असा शोभायात्रेचा मार्ग राहिला.


### युद्धकलेची थरारक प्रात्यक्षिके

विद्यापीठाच्या मुख्य इमारतीसमोर खंडोबा-वेताळच्या मर्दानीराज सुहास ठोंबरे आखाड्याचे वस्ताद आनंदराव ठोंबरे यांच्या नेतृत्वाखाली शिवकालीन युद्धकलेची थरारक प्रात्यक्षिके सादर झाली. लाठी, तलवार, पट्टा, लिंबू काढणी, विटा, फरी गदकाच्या प्रात्यक्षिकांना उपस्थितांनी दाद दिली. शाहीर मिलिंद सावंत, शिवतेज ठोंबरे, सरला गायकवाड, स्नेहल नरके, दीप्ती जाधव, अथर्व जाधव, भय्या गायकवाड, शैलेश जाधव, शिवबा व शाहूराज सावंत, शिवानी व केदार ठोंबरे, बाळासाहेब शिकलगार यांनी प्रात्यक्षिके सादर केली. विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी लाठीचे प्रात्यक्षिक सादर करत उपस्थितांना थक्क केले.

### आजचे कार्यक्रम

- **९ : ३०**
  - **प्रश्नमंजूषा** (नीलांबरी हॉल)
  - **क्लासिकल इन्स्ट्रूमेंट सोलो** (संगीत व नाट्यशास्त्र विभाग)
  - **पोस्टर मेकिंग** (मानव्यशास्त्र सभागृह)
- **१० : ००**
  - **वेस्टर्न सोलो** (लोककला केंद्र)
  - **एकांकिका (भाषा भवन)**
- **१ : ००**
  - **वेस्टर्न ग्रुप गीत** (लोककला केंद्र)
  - **वक्तृत्व** (नीलांबरी हॉल)
  - **कोलाज** (मानव्यशास्त्र सभागृह)
- **२ : ००**
  - **क्लासिक इन्स्ट्रूमेंटस सोलो** (संगीत व नाट्यशास्त्र विभाग)
- **४ : ००**
  - **फोक ऑर्केस्ट्रॉ** (लोककला केंद्र)

www.facebook.com/
Sakal Kolhapur



# रूप एकतेचे !

www.facebook.com/Sakal.Kolhapur येथे पाहा आणखी छायाचित्रे...

कोल्हापूर : 'शिवोत्सव' या राष्ट्रीय युवा महोत्सवाला आजपासून शिवाजी विद्यापीठात सुरवात झाली. देशभरातील ७४ विद्यापीठांचा सहभाग असल्याने साहजिकच आज पहिल्या दिवशी प्रत्येक विद्यापीठाचा संघ आपल्या प्रादेशिक वैशिष्ट्यांसह शोभायात्रेत सहभागी झाला. त्यामुळे पंजाबपासून केरळपर्यंतच्या विविधांगी भारतीय संस्कृती या शोभायात्रेतून आज कोल्हापुरात अवतरली. याची ही चित्रमय झलक...

(सर्व छायाचित्रे : संजय देसाई)



म्हैसूर विद्यापीठाचे विद्यार्थी 'कुनीता' नृत्य सादर करताना.



जल्लोष करताना कुरुक्षेत्र विद्यापीठाचे विद्यार्थी.




आंध्र प्रदेशच्या कृष्णा विद्यापीठातील पारंपरिक वेशभूषेत सहभागी विद्यार्थिनी



पारंपरिक वेशभूषेत आसाममधील गुवाहाटी विद्यापीठाचे विद्यार्थी.



केरळच्या संस्कृत विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी 'थय्यम' नृत्याने सर्वांचे लक्ष वेधले.



[illegible] देताना जम्मू आणि काश्मीर विद्यापीठाच्या विद्यार्थिनी.



पंजाब कृषी विद्यापीठातील विद्यार्थी पारंपरिक वेशभूषेत.



भांगडा नृत्याने शोभायात्रेत रंगत आणणारे [illegible] विद्यापीठाचे विद्यार्थी.




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातर्फे आयोजित 'शिवोत्सव २०१७' महोत्सवाचे रोपट्यास पाणी घालून उद्‌घाटन करताना श्रीमंत शाहू छत्रपती महाराज. शेजारी अभिनेता सचिन खेडेकर, बीसीयूडीचे संचालक डॉ. डी. आर. मोरे, डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. डेव्हिड सॅम्पसन, डॉ. पी. टी. गायकवाड आदी. (संजय देसाई :** सकाळ छायाचित्रसेवा**)**

# अपयश आले तरी हसायला शिका

## सचिन खेडेकर : महोत्सवाचे दिमाखात उद्‌घाटन

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १० : ''युवा महोत्सवात जिंकणारे जिंकतील; पण हरणारेही पुन्हा जिंकू शकतात. आयुष्यात संधीही खूप मिळतील. त्यामुळे अपयश आले तरी हसायला शिका,'' असा सल्ला सुप्रसिद्ध अभिनेते सचिन खेडेकर यांनी आज तरुणाईला दिला.

> **माझ्या अंगी आज असलेला जोश विद्यापीठात कमावलेल्या त्या पदकांमुळेच आहे. आज मला अनेक पुरस्कार मिळाले आहेत; पण विद्यापीठात मिळविलेली पदके मी आजही माझ्या खोलीत सर्वांत उंच ठिकाणी दिमाखात ठेवलेली आहेत.**
>
> - **सचिन खेडेकर,** अभिनेते

निमित्त होते शिवाजी विद्यापीठातर्फे आयोजित ३२ व्या आंतरविद्यापीठ राष्ट्रीय युवा 'शिवोत्सव' महोत्सवाच्या उद्‌घाटनाचे. श्रीमंत शाहू छत्रपती महाराज यांच्या हस्ते रोपट्यास पाणी घालून महोत्सवाचे उद्‌घाटन झाले. या वेळी 'छत्रपती शिवाजी महाराज की जय', 'जय भवानी जय शिवाजी' जयघोषाने लोककला केंद्राचा परिसर दुमदुमला. बीसीयूडीचे संचालक **पान ८ वर »**




कोल्हापूर : शोभायात्रेत सहभागी झालेल्या विद्यार्थिनी.

# अपयश आले तरी हसायला शिका

# अपयश आले तरी हसायला शिका

» पान १ वरून

डॉ. डी. आर. मोरे अध्यक्षस्थानी होते.

श्री. खेडेकर म्हणाले, "माझ्या कलाक्षेत्रातील प्रवेशाची सुरवात आंतरविद्यापीठ महोत्सवातील वादविवाद स्पर्धेद्वारे झाली. माझे महाविद्यालयीन दिवसही जोशपूर्ण होते. माझे शिक्षकच माझ्यासाठी सर्व काही होते. कारण त्यांच्या चर्चा ऐकून वादविवादात मला यश मिळत होते. आज विद्यार्थी सोशल मीडियाद्वारे रस्ते शोधत आहेत. ज्ञानाची उसनवारी करून शिकत आहेत. आम्ही मात्र गुरूचा अनुभव पाठीशी घेऊन पुढे जात होतो. एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे ज्ञानाचे अनुभवसिद्ध हस्तांतरण होत होते. महोत्सवात सर्वसाधारणपणे ७७ विद्यापीठांतील दोन हजार विद्यार्थी सहभागी होत आहेत. जो महोत्सवात पदक मिळवेल, तो महोत्सवाची आठवण कायम ठेवेल."

शाहू महाराज म्हणाले, "राजर्षी छत्रपती शाहूंनी शतकापूर्वी ज्या योजना राबविल्या होत्या, त्याचे अनुकरण केंद्र व राज्य सरकार आता करत आहे. भारताबाबत सांगायचे तर हा बहुविविधता, बहुसंस्कृती असलेला देश आहे. प्रत्येकाची वैशिष्ट्यपूर्ण संस्कृती असून, कोणीही आपली संस्कृती इतरांवर लादण्याचा प्रयत्न करत नाही. महोत्सवात त्याचे प्रतिबिंब उमटेल आणि बहुविविधतेतील भारताची एकात्मता दिसून येईल."

डॉ. मोरे म्हणाले, "शिवाजी विद्यापीठ राज्यातील प्रथम क्रमांकाचे विद्यापीठ बनले आहे. मुंबई, पुणे विद्यापीठाला आपल्या विद्यापीठाने मागे टाकले असून, नॅशनल रँकिंग क्रमवारीत २८ वा क्रमांक मिळविला आहे. गुणवत्तेत कोणतीही तडजोड न करता विद्यापीठ विद्यार्थ्यांवर लक्ष केंद्रित करत आहे."

भारतीय विद्यापीठ महासंघाचे सहसचिव डॉ. डेव्हिड सॅम्पसन म्हणाले, "मानवता व सांस्कृतिक मूल्यांची जपणूक करण्यासाठी आपण येथे आलो असून, जागतिक पटलावर ही मूल्ये आदर्शवत अशी ठरणारी आहेत. तारुण्यातले जीवन खूप काही शिकण्यासाठी असते. त्याच वयात आपण एकमेकांकडून शिकत असतो आणि शिकवतही असतो. संकटांची चिंता न करता सृजनात्मक व राजदूत व्हा. देशासाठी असे काम करा, की ज्यामुळे प्रत्येक जण तुम्हाला डोळे भरून पाहण्यासाठी आसुसलेला असेल."

विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी बहुरंगी कोल्हापूरची वैशिष्ट्ये सांगून बहुसांस्कृतिकतेची माहिती दिली. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी स्वागत केले. याप्रसंगी भारतीय विद्यापीठ महासंघाचे निरीक्षक एस. के. शर्मा, वित्त व लेखाधिकारी डॉ. अजित चौगुले, राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, डॉ. पी. टी. गायकवाड उपस्थित होते. सुषमा कोंडुस्कर व सुप्रिया पाटील यांनी सूत्रसंचालन केले. परीक्षा नियंत्रक महेश काकडे यांनी आभार मानले.

## 'नाट्यशास्त्र विभाग विद्यापीठांचा दागिना'

**श्री. खेडेकर म्हणाले, "कलेचे मार्गदर्शन होऊ शकते. त्यासाठी नाट्यशास्त्र विभाग प्रत्येक विद्यापीठात आहे. नाट्यशास्त्र विभाग हा विद्यापीठांसाठी मोठा दागिना आहे. दिग्दर्शक वामन केंद्रे हे नाट्यशास्त्र विभागातूनच पुढे आलेले व्यक्तिमत्त्व आहे."**

## 'त्या भेटीची एक आठवण'

**डॉ. सॅम्पसन म्हणाले, "ऑक्टोबर १९८५ला पहिल्या आंतरविद्यापीठ युवा महोत्सवात मी वीस वर्षांचा, तर शाहू महाराज तीस वर्षांचे असताना एकत्र होतो. तब्बल तीस वर्षांनंतर आम्ही पुन्हा एकत्र आल्याने मोठा आनंद झाला आहे."**

## 'मुस्कुराहट हुस्न का जेवर...'

**डॉ. सॅम्पसन यांनी 'जवानी सूरज की धूप होती है,' असे सांगत शेरोशायरीतून उपस्थितांना ऊर्जा दिली. मुस्कुराहट हुस्न का जेवर है, असे स्पष्ट करत आयुष्यातील आव्हानांशी संघर्ष करण्यास सक्षम व्हा, असा सल्ला तरुणाईला दिला.**

## महाराष्ट्र संस्कृतीचे दर्शन

**दरम्यान, उद्घाटनानंतर यजमान शिवाजी विद्यापीठातील कलाकारांनी 'महाराष्ट्राचे दर्शन' कार्यक्रमातून महाराष्ट्र संस्कृतीचे दर्शन घडविले. लोकगीत व लोकनृत्ये सादर करत कलाकारांनी उपस्थितांची मने जिंकली. कोळी, भारूड, धनगरी, वासुदेव गीतांवर कलाकारांची पावले थिरकल्यानंतर लोककला केंद्र टाळ्या व शिट्यांनी दणाणून गेले. तासापेक्षा जास्त काळ रंगलेल्या कार्यक्रमाने महोत्सवाची रंगत टिपेला पोचवली.**



**डीवायपी सिटी (पीव्हीआर सिनेमा, कोल्हापूर)**

| चित्रपट | खेळ | वेळ |
|---|---|---|
| बघतोस काय मुजरा कर (मराठी) | १ | ७॥ वा. |
| Jolly L.L.B.-2 | ८ | ९॥, ११, २, ३.४०, ५, ८, ९.५०, ११ वा. |